नंदुरबार शहरातील **पीर तलावाच्या** पर्यावरण संवर्धनासाठी नगरपरिषदेकडून राबवण्यात येणा-या प्रकल्पातील कामासाठी निधी मुक्त करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**पर्यावरण विभाग, मंत्रालय,**
शासन निर्णय क्रमांक: रासयो-२०१०/प्र.क्र.११३/ता.क. ३
नवीन प्रशासन भवन, १५वा मजला, मादाम कामा रोड, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: १५ जानेवारी,२०११.

वाचा:- १) नंदुरबार नगरपरिषदेचे पत्र क्र.नंनप/पिरतलाव संवर्धन/२१३१/१०, दि.२५ ऑगस्ट, २०१०.
२) विभागाचा समक्रमांकाचा शासन निर्णय दि. १३ ऑक्टोबर, २०१०.

**प्रस्तावना:-**

राज्यातील तलाव, सरोवरे व मोठे जलाशय यांचे पर्यावरणीयदृष्टया संवर्धन करण्यासाठी राज्य शासनाने राज्य योजनेतंर्गत राज्य सरोवर संवर्धन योजना सन २००६-०७ या आर्थिक वर्षापासून सुरू केली आहे. या योजनेतंर्गत सन २०१०-११ या आर्थिक वर्षात नंदुरबार नगरपरिषद, नंदुरबार यांचेमार्फत प्राप्त पीर तलावाचा प्रस्तावास संदर्भाधीन दि.१३ ऑक्टोबर, २०१०चा शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

उपरोक्त मान्यतेचा अनुषंगाने नंदुरबार शहरातील पीर तलावाच्या पर्यावरण संवर्धनासाठी निधी मुक्त करण्याचा शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

राज्य योजनांतर्गत योजनेतील राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत नंदुरबार शहरातील पीर तलावाच्या पर्यावरणीयदृष्टया संवर्धन करण्यासाठी मंजूर एकूण रु.४१०.६३ लाखांपैकी अनुज्ञेय राज्य हिस्स्यांचे ८० टक्के म्हणजेच रुपये ३२८.५० लाखापैकी, **या शासन निर्णयाद्वारे रुपये १२५.०० लाख (अक्षरी रूपये एक कोटी पंचवीस लाख फक्त)** मुख्याधिकारी, नंदुरबार नगरपरिषद, नंदुरबार यांना वितरीत / मुक्त करण्यास संदर्भाधीन दिनांक १३ ऑक्टोबर, २०१० च्या शासन निर्णयातील सर्व मार्गदर्शक तत्वे, अटी व शर्तींच्या अधीन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

२. यासाठी **मुख्याधिकारी, नंदुरबार नगरपरिषद, नंदुरबार, (Chief Officer, Nandurbar Municipal Council, Nandurbar) यांचे नावे रुपये १२५.०० लाख (अक्षरी रूपये एक कोटी पंचवीस लाख फक्त ) एवढया निधीचा धनादेश काढण्यात यावा.**

**३.** "नंदुरबार नगरपरिषदेस अदा करावयाचा रू.१२५.०० लाख अधिदान व लेखाधिकारी यांच्यामार्फत कोषागारातून काढून **मुख्याधिकारी, नंदुरबार नगरपरिषद, नंदुरबार** यांना अदा करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून श्री.दे.के.मानकर, अवरसचिव, पर्यावरण विभाग व नियंत्रक अधिकारी म्हणून श्री.श्या.ना.धकाते, उपसचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय यांना घोषित करण्यात येत आहे. त्यांनी **मुख्याधिकारी, नंदुरबार नगरपरिषद, नंदुरबार** यांना **रू.१२५.०० लाख (अक्षरी रूपये एक कोटी पंचवीस लाख फक्त)** अधिदान व लेखाधिकारी कार्यालय, मुंबई येथून स्वतंत्र धनादेशाद्वारे वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

४.		सदर होणारा खर्च मागणी क्र. यू-४,३४३५-परिस्थितीकी व पर्यावरण-०४-प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण (१०३) वायु व जल प्रदुषण प्रतिबंध, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना, (०२)(०७) राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना-(३४३५ ०१ ८२), ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या मुख्य लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा व तो सन २०१०-११ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. सन २०१०-११ या आर्थिक वर्षात राज्य सरोवर संबर्धन योजनासाठी एकूण रू.५००.०० लक्ष एवढी तरतुद मंजुर व अर्थसंकल्पीत करण्यात आलेली आहे.

५.		**तलावाची सद्यस्थितीतील खोली (depth) ची शास्त्रीय पध्दतीने मोजणी करून मुख्याधिकारी, नंदुरबार नगर परिषद यांनी सादर करावी. सद्यस्थितीतील तलावाच्या पाण्याची Quality (PH, BOD, COD, TDS, turbidity, heavy metal, Colour इ. सह) विषयक अहवाल निधीची वापर सुरू करण्यापूर्वी सादर करावा. योजनेच्या अंमलबजावणीची पूर्ण जबाबदारी मुख्याधिकारी, नंदूरबार यांची असेल.**

६.		हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांची अनौ.संदर्भ क्रमांक ११५०/व्यय-१६/१०, दिनंक २३.११.२०१० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

७.		सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर (www. maharashtra.gov.in) उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०११०११५२०३२३१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(दे.के.मानकर)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,
प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
जिल्हाधिकारी, नंदूरबार.
मख्याधीकारी, नंदूरबार नगरपरिषद..
संचालक, नगरपालिका प्रशासन वरळी, मुंबई.
मा. मंत्री (पर्यावरण), यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (पर्यावरण), यांचे खाजगी सचिव
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा व हक्कदारी/लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
वित्त विभाग, व्यय-१६/ अर्थसंकल्प -७, मंत्रालय, मुंबई.
नियोजन विभाग, कार्यासन-१४६२, मंत्रालय, मुंबई.
रोखशाखा, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती.